193

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २२ /११/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३.

**विषय :-** मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर करावयाच्या अग्रिमाबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/विनियम, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३११०९१७५०४६५६०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक,लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह )
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे / नागरी हक्क संरक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.



Scanned with CamScanner

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था / आस्थापना /प्रशासन / महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग/ सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान,नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
उप संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “वित्त व लेखा “ या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर करावयाच्या अग्रिमाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- अग्रिम-२०२२/प्र.क्र.३३/२०२२/ विनियम**
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक- ०९ नोव्हेंबर, २०२३.

**वाचा** : १) शासन निर्णय, वित्त विभाग, अग्रिम -२०१३/प्र.क्र.१०/२०१३/ विनियम, दि.२०.८.२०१४
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, दि.१७.४.२०१५ (वित्तीय अधिकार प्रदान करणे संदर्भात)
३) शासन निर्णय, वित्त विभाग, अग्रिम -२०१३/प्र.क्र.१०/२०१३/ विनियम, दि.७.५.२०१५
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०१५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६.९.१९९७ (दंडनीय व्याज आकारण्यासंदर्भात)

**प्रस्तावना -:**

वित्त विभाग, शासन निर्णय दि.२०.८.२०१४ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदी करण्यासाठी अग्रिम मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. आता वित्त विभाग, शासन अधिसूचना दि.३० जानेवारी, २०१९ अन्वये ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी दि.१.१.२०१६ पासून सुधारीत करण्यात आल्या आहेत. या सुधारीत वेतन श्रेणीप्रमाणे विविध प्रकारातील वाहन खरेदी करण्याकरीता अग्रिम मर्यादेत व वाहनाच्या किंमत मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नवीन मोटार सायकल / स्कूटर / मोपेड /सायकल व दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी तीन चाकी स्वयंचलित सायकल किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी शासकीय अधिकारी /कर्मचाऱ्यांना मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील नियम १३६,१३७ व १३९ च्या अधीन आणि तसेच खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन सुधारित वेतन मर्यादेनुसार पुढील प्रमाणे सुधारीत अग्रिम अनुज्ञेय राहील.

(अ) अग्रिम मर्यादा

| अ.क्र. | तपशील | अग्रिम मर्यादा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | नवीन सायकल खरेदी करण्यासाठी अग्रिम:- | ₹१५,०००/- किंवा सायकलची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील. |

| | | |
|---|---|---|
| २ | नवीन मोपेड खरेदी करण्यासाठी अग्रिम :- | ₹६५,०००/- किंवा मोपेडची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील. |
| ३ | नवीन स्कूटर खरेदी करण्यासाठी अग्रिम:- | ₹१,४५,०००/- किंवा स्कूटरची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील. |
| ४ | नवीन मोटार सायकल, दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी अग्रिम | ₹१,६५,०००/- किंवा मोटार-सायकलची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रिम अनुज्ञेय राहील. |

**(ब) <u>अग्रिम मंजूरीच्या अटी-</u>**

(१) अग्रिमासाठी अर्ज करणाऱ्या कर्मचाऱ्याची शासनाच्या सेवेतील नियुक्ती संबंधित पदाच्या सेवाभरती नियमांनुसार करण्यात आलेली असली पाहिजे आणि अशाप्रकारे करण्यात आलेल्या नियुक्तीनंतर कमीत कमी ३ वर्षांची सलग सेवा झाली असली पाहिजे.

तथापि, अस्थिव्यंग दिव्यांग कर्मचाऱ्यांस Scooter with adaption हे उपकरण पुरविण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या क्र.दिव्यांग-२०१२/प्र.क्र.३२/दि.क.-२, दि.१ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार या उपकरणासाठी रु.१,००,०००/- मंजूर करण्यात येतात. Scooter with adaption हे उपकरण खरेदीसाठी ₹१,००,०००/- या रकमेवरील येणारा वाढीव खर्च हा वाहन अग्रिम म्हणून मंजूर करण्याकरिता, नियुक्तीनंतर कमीत कमी ३ वर्षांची सलग सेवा झालेली असली पाहिजे ही अट अस्थिव्यंग दिव्यांग कर्मचाऱ्यांबाबत शिथील करण्यात येत आहे.

(२) मोटार सायकल/स्कूटर/मोपेड वाहन चालविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून, कुटुंबातील एका व्यक्तिला मिळालेल्या कायम अनुज्ञप्तीची (Permanent Licence) छायाप्रत सादर करावी लागेल.

(३) अग्रिम मंजूरीपूर्वी अग्रिमासाठी अर्ज करणाऱ्या अधिकाऱ्याची / कर्मचाऱ्याची सेवानिवृत्तीपूर्वी संपूर्ण अग्रिम रक्कम परतफेड करण्याची क्षमता असल्याची, अग्रिम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याची खात्री असावी.

(४) अर्जदाराने आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर सक्षम प्राधिकारी, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ नुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकाराप्रमाणे वाहन अग्रिम मंजूर करू शकतील.

(५) वाहन अग्रिम मंजूरीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत अग्रिम धारकाने वाहन खरेदी करावी. तसेच खरेदी केलेल्या वाहनाच्या उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व नोंदणीचे कागदपत्रे शासनास सादर करावीत. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम दंडनीय व्याजासह एक रकमी वसूल करण्यात यावी.

(६) वाहन अग्रिमाची व्याजासह पूर्ण परतफेड होईपर्यंत वाहन शासनाकडे गहाण राहील. त्यासाठी सबंधित कर्मचाऱ्यास विहित नमुन्यात व कार्यपध्दतीप्रमाणे गहाणखत भरून देणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम दंडनीय व्याजासह एक रकमी वसूल करण्यात येईल.

अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम,१९५९ मधील नियम १२४ (बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६.९.१९९७ मध्ये नमूद, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.

(७) अग्रिमाची रक्कम ज्या महिन्यात वितरीत केली असेल त्याच्या पुढील महिन्यापासून अग्रिमाच्या वसूलीस सुरुवात करण्यात यावी.

(८) वाहन अग्रिम रकमेच्या नियमित वसुलीसाठी तसेच मंजूर अग्रिम रकमेपेक्षा जादा वसुली होत असल्यास त्यास अर्जदार स्वत: ही जबाबदार राहील.

(९) अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला तरीही वाहन अग्रिम तसेच शासनाकडील इतर अन्य अग्रिमांची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहील.

(१०) वित्त विभागाने आदेशाव्दारे वेळोवेळी विहीत केल्यानुसार व्याजाचे दर राहतील.

(११) तसेच, जुनी मोटार सायकल/स्कूटर/मोपेड/सायकल व दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी जुनी तीन चाकी सायकल खरेदीकरीता अग्रिम मंजूर करण्यात येणार नाही.

(१२) मोटार सायकल, स्कूटर, मोपेड, सायकल व दिव्यांग शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित तीन चाकी सायकल, स्कूटर विथ अडॅप्शन व मोपेडचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्याची जबाबदारी संबधित अग्रिम धारकाची राहील व तो सतत चालू राहील याची दक्षता घेणे आवश्यक राहील.

(१३) सायकल / दुचाकी / तीन चाकीसाठी संपूर्ण सेवा कालावधीत एकदाच अग्रिम अनुज्ञेय राहील. *तथापि, दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या तीन चाकी सायकल खरेदी करीता ही अट शिथिल करण्यात येत आहे.*

(१४) दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या अर्जदारास (दुसऱ्या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता) या अग्रिमाचा लाभ घेता येणार नाही.

(१५) शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनातून होणारी एकूण वजाती त्याच्या मासिक वित्त लब्धीच्या ५०% पेक्षा अधिक असता कामा नये.

**(क) <u>अग्रिम वसुली कालावधी</u>**

| अ.क्र. | तपशील | अग्रिम वसुली कालावधी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | नवीन सायकल खरेदी करण्यासाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली १० समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. |
| २. | नवीन मोपेड खरेदी करण्यासाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली व्याजासह ३६ समान मासिक हप्त्यामध्ये करण्यात यावी. प्रथम २४ मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल व नंतर १२ मासिक हप्त्यांमध्ये व्याज वसूल करण्यात यावे. |

| | | |
|---|---|---|
| ३. | नवीन स्कूटर खरेदी करण्यासाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली व्याजासह ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. प्रथम ३६ मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल व नंतर १२ मासिक हप्त्यांमध्ये व्याज वसूल करण्यात यावे. |
| ४. | नवीन मोटार सायकल, दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी अग्रिम | अग्रिमाची वसूली व्याजासह ६० समान मासिक हप्त्यांमध्ये करण्यात यावी. प्रथम ४८ मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल व नंतर १२ मासिक हप्त्यांमध्ये व्याज वसूल करण्यात यावे. |

मात्र एखादा कर्मचारी नियतवयोमानानुसार उपरोक्तप्रमाणे वसुली होण्यापूर्वीच सेवानिवृत होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली पूर्ण होईल, अशा प्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यात यावे.

(ड) <u>अग्रिम व्याजाचा दर</u>- व्याज दराबाबत अन्य आदेश निर्गमित होईपर्यंत या आदेशान्वये मोटार सायकल /स्कूटर / मोपेड /दिव्यांग राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी स्वयंचलित किंवा मनुष्य बळाने चालणारी तीन चाकी सायकल खरेदीसाठी मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिम प्रकरणी व्याजाची परिगणना वार्षिक ९% या दराने करावी. तसेच दुचाकी सायकल खरेदी अग्रिम हे व्याजरहित राहील.

२. मुंबई वित्तीय नियम, १९५९ मधील संबंधित नियम- १३६ मध्ये आवश्यक ती सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

३. हे आदेश सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२३११०९१७५०४६५६०५ असा आहे. प्रस्तुत शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra
Uttamrao Gadekar

Digitally signed by Rajendra Uttamrao Gadekar
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=422009, street=Infront of Guru Govind Sing polytechnic Pathardi road,Nashik,Cidco Colony,Nashik,Nashik, pseudonym=a51e3d1ac32115d0d5c8203f904c1741, title=7921, serialNumber=37a42e182bace4c129abbeb54e27836d32d401560638f644a547867205474ee5, o=Personal, cn=Rajendra Uttamrao Gadekar
Date: 2023.11.09 17:50:38 +05'30'

**( डॉ.राजेंद्र गाडेकर )**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. सर्व सन्माननीय विधान परिषद /विधानसभा व संसद सदस्य,
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
८. मंत्रालयीन सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा / अपील शाखा), मुंबई

१०. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१५. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८. महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई,
१९. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२०. प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, पुणे / नागपूर / औरंगाबाद / अकोला / अमरावती / ठाणे / नाशिक / सोलापूर / मुंबई,
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२२. सर्व विभागीय आयुक्त,
२३. सर्व जिल्हाधिकारी,
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२६. सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ,
२८. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकणभवन, नवी मुंबई,
२९. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर,
३०. सर्व कोषागार अधिकारी,
३१. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३२. निवड नस्ती (विनियम), वित्त विभाग.

******************